दि.०७/०५/२०२६. प्रकरण क्रं. :— १५०७/पीडब्ल्यू/२०२५
साक्षीदार क्रं.:—१ निशाणी क्रं. :— ८ पुढे चालू.

शपथेवर पुढिल उलटतपास
आरोपी क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री अरोरा यांच्यामार्फत

६५. हे म्हणने खरे आहे की, नागराजू याने घेवून गेलेला बॉक्स मी उघडून बघितलेला नव्हता. तसेच मला त्या बॉक्समध्ये काय होते, याची माहिती नव्हते. तो बॉक्स वजनाने भारी होता पण मला निश्चित वजन सांगता येत नाही. मी त्या बॉक्सचा फोटो घेतला नाही. तो बॉक्स नागराजू याने घेवून गेल्या बाबत मी नोंद घेतली नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे तो बॉक्स नागराजू याने घेवून गेल्या बाबत माझ्या व्यतिरिक्त अन्य साक्षीदार नाहीत. मी त्या बॉक्सचा रंग पोलीसांना तसेच कोर्टात सांगितलेला नाही.

६६. मी नागराजू याने घेवून गेलेली लॅपटॉप बॅग तपासलेली नव्हती. मी लॅपटॉप बॅगचे वर्णन पोलीसांना सांगितलेले नव्हते. त्या लॅपटॉप बॅगेमध्ये काय होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, नागराजू कंपनीतून ज्या गाडीतून गेला त्या गाडीचा नंबर मी पोलीसांना सांगितला नव्हता. आज मला त्या गाडीचा नंबर सांगता येत नाही. हे म्हणने खरे नाही की, मी बॉक्सबाबत खोटी साक्ष देत आहे. मी पोलीसांना बॅग चेक करणे, हे माझे काम आहे, हे सांगितले नव्हते. बॅग चेक करण्याचे काम माझे नव्हते, हे म्हणणे खरे नाही. मी आज माझे बॅग चेक करण्याचे काम होते, असा दाखवणारा कागद दाखल करू शकत नाही.

६७. हे म्हणने खरे नाही की, माझे बॅग चेक करण्याचे काम नव्हते त्यामूळे मी तसा कागद दाखल करू शकत नाही. माझ्या नेमणूक

पत्रामध्ये माझे काम बॅग चेक करण्याचे सुध्दा आहे, असे लिहलेले नाही. मनोज पांडे यांनी सांगितल्यामुळे मी नागराजू याची बॅग चेक केली नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी माझे बॅग चेक करण्याचे काम होते, असे सांगितले नव्हते. मनोज पांडे यांनी मला बॅग चेक करू नकोस, असे सांगितल्याचे, मी कंपनीतील लोकांना सांगितले नाही.

६८. मी फिर्यादी कंपनीत सध्या सिक्युरीटी गार्ड म्हणून काम करतो. मला फिर्यादी कंपनी पगार देते. हे म्हणने खरे नाही की, मी कंपनीच्या बाहेरच्या लोकांचेसूध्दा आदेश पालन करतो. मला जास्त लिहता वाचता येत नाही. हे म्हणने खरे नाही की, फिर्यादी कंपनी मला पगार देते म्हणून मी आज आरोपी विरूध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी कंपनीकडून पैसे घेवून आज आरोपी विरूध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी कंपनीच्या मॅनेजमेंटच्या सांगण्यावरून आज आरोपी विरूध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

<u>उलट तपास आरोपी क्र.१ व क्र.३ करीता वकिलांना पुकारता गैरहजर त्यामुळे त्यांचा उलट तपास तहकूब</u>.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

(अ. भा. जाधव)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
७१ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.
दि.०७/०५/२०२६.

दि.०७/०५/२०२६.
सराद.